# University of Mumbai

शिनिमावि(विशि)/आयसीडी/२०१८–१९/७११

परिपत्रक:—

विद्यापीठाच्या विविध विभागांचे संचालक/विभागप्रमुख, प्राचार्य, सर ज. जी वास्तुशास्त्र महाविद्यालय, समन्वयक, रत्नागिरी/ठाणे व कल्याण उपकेंद्र, विश्वभूषण भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, अंबाडवे, विजयालक्ष्मी विश्वनाथ दळवी महाविद्यालय, तळेरे, प्रभारी संचालक, ज्ञानस्त्रोत केंद्र यांना कळविण्यात येते की, विद्यापीठाच्या विविध अनुदानित/विनाअनुदानित विभागांमध्ये कार्यरत शिक्षक त्यांच्या किरकोळ तक्रारी थेट उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे मंत्री महोदय अथवा विद्यापीठाचे मा. कुलपती, यांच्याकडे सादर करतात.

अलीकडेच मा. कुलपती कार्यालयाकडून अशा प्रकारच्या थेट तक्रारी मा. कुलपती कार्यालयाकडे न पाठवता प्रथम मुंबई विद्यापीठाचे मा. कुलगुरू यांच्याकडे पाठवाव्यात, असे निर्देश दिले आहेत.

त्या अनुषंगाने मला प्राप्त आदेशानुसार आपणांस कळविण्यात येते की, विद्यापीठातील शिक्षकांनी त्यांच्या कुठल्याही सूचना /तक्रारी याबाबतची पत्रे त्यांच्या संबंधित विभागप्रमुखामार्फत मा. कुलसचिव अथवा मा. कुलगुरू यांच्याकडे पाठवाव्यात,विभागप्रमुखांच्या विरोधात जरी काही तक्रार असेल तरीही सदर तक्रार किंवा त्यांच्या सुचना विभागप्रमुखांच्या कार्यालयामार्फतच अग्रेषित कराव्यात. विभाग प्रमुखांनी सदर तक्रार पुढे अग्रेषित न केल्यास आपल्या सुचनांची/तक्रारीची अग्रिम प्रत कुलगुरूंकडे पाठवावी व तसे मुळ प्रतीवर नमूद करावे.

सदर परिपत्रक सर्व संबंधितांच्या निर्देशनास आणून द्यावे व परिपत्रकातील सुचनांचे तंतोतंत पालन करावे.

22.10.18

(प्रा. एस. जी. भीरूड)
कुलसचिव (प्रभारी)

मुंबई : ४०० ०३२
दिनांक:२२ऑक्टोबर, २०१८

प्रति,

विद्यापीठाच्या विविध विभागांचे संचालक/विभागप्रमुख, प्राचार्य, सर ज. जी वास्तुशास्त्र महाविद्यालय, समन्वयक, रत्नागिरी/ठाणे व कल्याण उपकेंद्र, विश्वभूषण भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, अंबाडवे, विजयालक्ष्मी विश्वनाथ दळवी महाविद्यालय, तळेरे, प्रभारी संचालक, ज्ञानस्त्रोत केंद्र.